# ४५ . सुरक्षितता (Safety)

जन्म व मृत्यूंच्या दरम्यान एका महत्वाच्या गोष्टीसाठी माणूस बैचैन असतो . ती गोष्ट म्हणजे सुरक्षितता . (**Safety**) माणूस जन्मतःच आनंदीवृत्तीचा असतो पण परिस्थिती त्याची मनोवृत्ती बदलायला कारणीभूत होते .

माणूस साधारणपणे भौतिक सुखांच्या मागेच असतो . आनंद देणा-या वस्तु जमवणे हा तर त्याचा उद्योगच असतो आणि मग एक वेळ अशी येते की ह्या वस्तुंची राखण करणे त्या व्यक्तीची डोकेदुःखी होते .खरेतर सुरक्षितता ही माणसाच्या मनात असणे आवश्यक असते . मनाची अस्थिरता माणसाला वस्तुच्या सुरक्षततेची काळजी करायला भाग पाडते .

हे सगळे विचार मनात येण्याचे कारण म्हणजे सकाळचा प्रसंग . आज नेहमीप्रमाणे सकाळी फिरायला गेलो असता , एका इमारतीच्या गेटवर एक सुरक्षारक्षक उभा होता . सुरक्षारक्षक कसला ? साधारण १८ वर्षाचा एक बारीकसा , ५ फुट उंची असेल नसेल असा तो सुरक्षरक्षक होता . अंगावर संस्थेचा शर्ट होता म्हणून त्याला सुरक्षारक्षक म्हणायचे . तो ड्रेससुद्धा त्याला एवढा सैल होत होता की मला बघूनच हसू आले . तो तरूण अर्थातच मराठी नव्हता हे ओळखायला वेळ लागला नाही . बहुधा उत्तर प्रदेशातील किंवा बिहार मधील असावा . अशा किरकोळ शरीरयष्टी असलेल्या तरूणाला सुरक्षारक्षकाची नोकरी म्हणजे जरा फारच झाले . बरे हातात साधा लाकडाचा दंडुकासुद्धा नाही . ह्याला खरेच कोण घाबरणार ? पण ह्याच्या भरवश्यावर त्या इमारतीतील रहिवाशी मात्र चिंतामुक्त झाले असतील . आहे की नाही मजा ?

सुरक्षिततेचा उपाय करणे एवढेच माणसाच्या हातात असते . पण आपल्या सर्वांची देवच सुरक्षा करत असतो . एक उदाहरणच देतो .

काही वर्षापूर्वी २६ जूलै २००५ ला मुंबईत भयानक अशी अतिवृष्टी झाली होती . ढगफुटीच होती . ३ - ४ तासात ४०" पाऊस पडला होता . मुंबईतील बराचसा भाग जलमय झाला होता . अगदी काही ठिकाणी पहिल्या माळयापर्यंत पाणी आले होते .

तुम्हाला माहितेच आहे की बरिचशी मंडळी बॅंकेत सुरक्षित जमा कक्ष भाडयाने घेतात . त्या लॉकरमध्ये दागदागिने, महत्वाचे कागदपत्रे वगैरे ठेवतात . काही बॅंकांच्या सुरक्षित जमा कक्षामध्ये पण पाणी घुसले होते व लॉकरमध्ये पाणी गेल्यामुळे दागदागिने , कागदपत्रे भिजली होती . काय गंमत आहे नाही . चोरांपासून बचाव व्हावा म्हणून लॉकर घेताला तर नुकसान चोरीमुळे नाही तर पाण्यामुळे झाले . म्हणूनच म्हणतो की वस्तु सुरक्षित ठेवायची की नाही हे भगवंताच्या हातात असते . आपण सर्वजण त्याच्या हातातील खेळणी आहोत .

आपण घराचा विमा काढतो . मध्यंतरी मुंबईत बोरीवली व ग्रॅंटरोड भागात दोन इमारती कोसळल्या . आपण कितीही भले फ्लॅटचा विमा काढला असेल पण **Claim** करायला आपण जिवंत तर राहणे गरजेचे आहे ना ?

मग हे कोण ठरविणार ? भगवंतच ना ?

काही लोक घराला मोठे कुलूप घालतात. कोणी दोनसुद्धा कुलूपे लावतात. आपल्या घराची सुरक्षा नुसत्या कुलूपावर अवलंबून नसते तर ते कुलूप ज्या कडीत घातले आहे , ती कडीसुद्धा मजबूत असणे आवश्यक असते. एकदा तर चोरमंडळी कुलूप काढायच्या भानगडीतच पडली नाहीत. त्यांनी भिंतीमधून ग्रीलच उचकटून बाहेर काढले. आता बोला !!!

माणूस जेवढा वस्तुच्या सुरक्षिततेचा विचार करतो तेवढा विचार स्वतःच्या शरीराच्या सुरक्षिततेचा करत नाही. मान्य आहे की शरीर नश्वर आहे पण शेवटी शरीर एक यंत्र आहे व आपण जशी यंत्राशी काळजी घेतो तशी शरीराची पण काळजी घेणे गरजेचे आहे. पण एवढा पुढचा विचार करेल तर माणूस कसला ?

लहानपणापासून व्यायामाची आवड लागलेली नसते. खायची प्यायची शिस्त तर नावच नको. जसे काय हा जन्म फक्त मौजमजा करण्यासाठीच देवाने दिला आहे. हातात पैसे असले कि आजारपणाचीही माणसाला फारशी भिती वाटत नाही. कारण वैद्यकशास्त्र ऐवढे पुढे गेले आहे की ते माणसाला सहजा सहजी मरू देणार नाही.

म्हातारपणची सुरक्षितता हा एक असाच स्वतंत्र विषय आहे. माणूस घाबरतो तो म्हातारपणाला व त्या अनुषंगाने जर बिछान्याला खिळलो तर ह्या भीतीला मग ह्या भितीवर उपाय म्हणून माणूस पैशाची बचत करतो. औषधपाण्याला पैसा उरला पाहिजे ह्याची तो काळजी घेतो. मेडिक्लेम पॉलीसी काढतो. हे सर्व केल्यानंतर तो नातेसंबंधात गुंतवणूक करू लागतो.

आपल्या मुलाबाळांवर आपण प्रेम करतो. त्यांना लहानाचे मोठे करतो. चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. चांगले संस्कार होतील असे बघतो. त्यांच्या भविष्याचा विचार करतो. खरेतर हे सर्व आपण कर्तव्याचा भाग म्हणून करत असतो पण एक सुप्तइच्छा असते की हीच मुले आपला म्हातारपणी सांभाळ करतील. अर्थात हा सुप्त विचार त्या मुलांना माहीत नसतो आणि मग जेव्हा म्हाता-या आई वडिलांची काळजी कोणी घ्यायची ह्यावरून मतभेद होतात तेव्हा तर ह्या तरूणपीढीची आपण किवच करू शकतो.

माझ्या मते आपण भौतिक गोष्टीच्या मागे फरफटले गेलो नाही तर आपले आयुष्य बरेच सुसह्य होऊ शकते. आपण जर का आयुष्यभर प्रामाणिकपणे कष्ट केले , परोपकार करायची सवय लावली तर आपल्या म्हातारपणी आपली काळजी घेण्याची जबाबदारी देवाचीच असेल. प्रश्न असा आहे कि हा विश्वास मात्र ठाम हवा. कर्मांवर श्रद्धा म्हणजेच देवाची भक्ती हे समीकरण मात्र डोक्यात गेले पाहिजे. त्यासाठी लहानपणापासून चांगले संस्कार केले गेले पाहिजेत. काय दोस्तानो तुम्ही आहात का सुरक्षित ?